जनसंपर्क कक्ष
17 AUG 2023
लोकमत
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' ध्वनिमालिकेचा समारोप

# स्वातंत्र्य टिकविण्याची जबाबदारी युवकांवर : माधवराव माने

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले. ते स्वातंत्र्य टिकविणे ही आजच्या तरुणांची व भावी पिढ्यांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माधवराव भुजंगराव माने यांनी बुधवारी केले.

शिवाजी विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्षातर्फे विद्यापीठाच्या 'शिववाणी' या यूट्यूब ध्वनी वाहिनीवरून १५ ऑगस्ट २०२२ पासून वर्षभर प्रसारित केलेल्या 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनिमालिकेचा समारोप येळावी (ता. तासगाव, जि. सांगली) येथील माधवराव माने यांच्या प्रमुख उपस्थितीत केला. विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मनोगत व्यक्त केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनिमालिकेमागील निर्मिती प्रक्रिया उलगडून सांगितली. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले.



शिवाजी विद्यापीठाच्या शिववाणी वाहिनीवरील 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना'चा समारोप बुधवारी झाला. यावेळी माधवराव माने यांनी मार्गदर्शन केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. अवनीश पाटील, डॉ. प्रमोद पाटील उपस्थित होते.


## प्रश्नमंजूषेमध्ये घोडे, जाधव व खिलारी प्रथम

'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनिमालिकेवर आधारित जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्यात विश्वास आनंदा घोडे (मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ) याने प्रथम क्रमांक मिळवला. सातारा जिल्ह्यातून वैष्णवी नानासाहेब जाधव (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव) यांनी तर सांगली जिल्ह्यातून संजीवनी शहाजी खिलारी (नागनाथअण्णा नायकवडी महाविद्यालय, झरे) यांनी प्रथम क्रमांक मिळवला.

17 AUG 2023
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्य टिकवणे तरुणांची जबाबदारी

## स्वातंत्र्यसैनिक माधवराव भुजंगराव माने यांचे प्रतिपादन



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिववाणी वाहिनीवरील 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनीमालिकेच्या समारोपप्रसंगी मार्गदर्शन करताना ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक माधवराव माने. सोबत डॉ. अवनीश पाटील, प्र–कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील, कुलगुरु डॉ. दिगंबर शिर्के आदी.**

प्रतिनिधी
कोल्हापूर

भारताला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्यासाठी लाखो स्वातंत्र्यसैनिकांनी बलिदान दिले आहे. ते स्वातंत्र्य टिकविणे ही तरुणांची व भावी पिढ्यांची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन स्वातंत्र्यसैनिक माधवराव भुजंगराव माने यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील इतिहास अधिविभाग आणि जनसंपर्क कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'आजादी का अमृतमहोत्सव' उपक्रमांतर्गत 'शिव–वाणी' या युट्यूब ध्वनीवाहिनीवरून प्रसारित 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनीमालिकेच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहातील समारंभाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते.

माने म्हणाले, विद्यापीठाने केलेला माझा सत्कार मी स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करलेल्या आणि झटलेल्या प्रत्येक स्वातंत्र्यसैनिकांच्यावतीने विनम्रतापूर्वक स्वीकारतो. स्वातंत्र्यासाठी महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही १९४२ च्या आंदोलनात सहभागी झालो. क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारही यशस्वी केले. स्वातंत्र्य फार कष्टातून साकारलेले आहे. ते टिकविण्याची जबाबदारी तरुणांची आहे.

ज्येष्ठ इतिहास अभ्यासक डॉ. अरुण भोसले म्हणाले, इतिहासात स्वातंत्र्यासाठी ९० वर्षांहून अधिक काळ चाललेला प्रदीर्घ लढा म्हणून नोंद आहे. स्वातंत्र्यलढ्यातील नेत्यांप्रमाणे चळवळ चालविणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांची फारशी नोंद आढळत नाही. विद्यापीठाने परिक्षेत्रातील स्वातंत्र्यसैनिकांचा संदर्भसंग्रह निर्माण केला आहे. प्र–कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले, स्वातंत्र्यसैनिकांची मालिका वर्षभर चालवून इतिहास घडविला आहे. स्वातंत्र्यासाठी योगदान देणाऱ्या ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांची माहिती संकलित करून त्यांनी केलेले प्रयत्न कौतुकास पात्र आहेत.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरु शिर्के म्हणाले, विद्यापीठाने स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना उजाळा देत अमृतमहोत्सव साजरा केला. समारोपप्रसंगी स्वातंत्र्यसैनिक माधवराव माने यांची उपस्थिती दुग्धशर्करा योग आहे. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'शिव–वाणी' ध्वनीवाहिनी आणि 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या ध्वनीमालिकेमागील निर्मिती प्रक्रिया सांगितली.

स्वातंत्र्यसैनिक माधवराव भुजंगराव माने यांना समर्पित असलेला 'अभिवादन स्वातंत्र्यसैनिकांना' या मालिकेतील अखेरच्या ३६६व्या भागाचे त्यांच्याच उपस्थितीत प्रसारण करण्यात आले. मालिकेवर आधारित प्रश्नमंजुषेमधील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक वितरण केले. डॉ. अरुण भोसले, इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनीश पाटील, डॉ. दत्तात्रय मचाले, डॉ. आलोक जत्राटकर, डॉ. भारतभूषण माळी, डॉ. अजितकुमार जाधव, डॉ. धीरज शिंदे, डॉ. सुरेश शिखरे, सुस्मिता खुटाळे, मल्हार जोशी, विनायक ठोंबरे यांचा कुलगुरूंच्या हस्ते प्रशस्तीपत्र व ग्रंथभेट देऊन गौरव केला.

डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, जिल्हासमन्वयक, इतिहास विभागप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### प्रश्नमंजूषेत जाधव, खिलारी व घोडे प्रथम

जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेत कोल्हापूर : विश्वास घोडे (मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), तुकाराम पाटील (र. भा. माडखोलकर महाविद्यालय, चंदगड) आणि किरण मुसळे (इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर). सातारा: वैष्णवी जाधव (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव), धनश्री पाटोळे (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव) आणि कल्याणी जाधव (शहाजीराजे महाविद्यालय, खटाव). सांगली: संजीवनी खिलारी (नागनाथअण्णा नायकवडी महाविद्यालय, झरे), स्वप्नाली पवार (नागनाथअण्णा नायकवडी महाविद्यालय, झरे) आणि धैर्यशील जाधव (आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, आष्टा).

पुण्यनगरी



# विद्यापीठात मॅरेथॉन, रॅलीचे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्य दिन मॅरेथॉन, रॅली आदी उपक्रमांसह उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात स्वातंत्र्य दिनानिमित्त राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्रसेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. यावेळी राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत यांचे सामूहिक गायन करण्यात आले. त्यानंतर सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

यावेळी 'मेरी मिट्टी, मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्य दिन मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. तसेच तंत्रज्ञान अधिविभाग व क्रीडा विभागाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही उपक्रमांना कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते फ्लॅग ऑफ करून प्रारंभ करण्यात आला. यावेळी प्र- कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, सिद्धार्थ शिंदे यांच्यासह विविध अधिकार मंडळांचे सदस्य, शिक्षक, अधिविभागप्रमुख, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

17 AUG 2023
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात ७७वा स्वातंत्र्यदिन मॅरेथॉन, रॅली आदी उपक्रमांसह मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. राष्ट्रगीत व विद्यापीठ गीत यांचे सामूहिक गायन करण्यात आले. मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

'मेरी मिट्टी, मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्यदिन मॅरेथॉनचे, तंत्रज्ञान अधिविभाग व क्रीडा विभागाच्या वतीने सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनानिमित्त कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनानिमित्त मंगळवारी आयोजित मॅरेथॉनचे 'फ्लॅगऑफ'ने उदघाटन कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते झाले.

# विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहपूर्ण वातावरणात

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात मंगळवारी स्वातंत्र्यदिन मॅरेथॉन, रॅली आदी उपक्रमांसह उत्साहपूर्ण वातावरणात साजरा केला. कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात स्वातंत्र्यदिनानिमित्त राष्ट्रध्वजास वंदन करण्यात आले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी दिली. मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी 'मेरी मिट्टी, मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने स्वातंत्र्यदिन मॅरेथॉनचे आयोजन केले. तंत्रज्ञान अधिविभाग व क्रीडा विभागाच्या वतीने सायकल रॅली काढली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. व्ही.एन. शिंदे, सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश गायकवाड, आदी उपस्थित होते.

सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित मॅरेथॉनचे 'फ्लॅगऑफ'ने उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील.

# विद्यापीठात मॅरेथॉन, रॅली

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यदिनी मॅरेथॉन, रॅली आदी उपक्रमांचे आयोजन केले होते. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते विद्यापीठाच्या प्रांगणात ध्वजवंदन झाले. राष्ट्रीय छात्र सेनेच्या परेडद्वारे राष्ट्रध्वजास सलामी देण्यात आली. सर्व मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले. या वेळी 'मेरी मिट्टी, मेरा देश' उपक्रमांतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे स्वातंत्र्य दिन मॅरेथॉनचे, तर तंत्रज्ञान अधिविभाग व क्रीडा विभागातर्फे सायकल रॅलीचे आयोजन केले होते. या दोन्ही उपक्रमांना कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते फ्लॅग-ऑफ करून प्रारंभ केला. या वेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. सरिता ठकार, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे आदी उपस्थित होते.

लोकमत

# नानासाहेब थोरात यांचे उद्या व्याख्यान

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. नानासाहेब थोरात यांचे उद्या शुक्रवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील संधी, उपयोजन व जागतिक संधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के हे अध्यक्षस्थानी असतील. तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित असतील, असे कक्षाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी सांगितले.

1 7 AUG 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात आज विशेष सत्राचे आयोजन

कोल्हापूर : 'डिजिटल युगातील लोकांद्वारे स्पर्धात्मक फायदा' या विषयावर शिवाजी विद्यापीठात गुरुवार (दि.१७) रोजी विशेष सत्राचे आयोजन केले आहे.

विद्यापीठाच्या मानव्यविद्या सभागृहात सायंकाळी ४ ते ५.३० या वेळेत कार्यक्रम होईल. प्रमुख मार्गदर्शक व वक्ते म्हणून भारत फोर्ज, पुणेचे एच.आर.-आय.आर. संचालक डॉ. संतोष भावे उपस्थित असणार आहेत. यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट व नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट, पुणे यांच्या संयुक्त सहकार्यातून सत्राचे आयोजन केले आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंटचे प्र-संचालक डॉ. नितीन माळी यांनी केले आहे.

सकाळ

# विद्यापीठात उद्या डॉ. नानासाहेब थोरात यांचे व्याख्यान

कोल्हापूर, ता. १६ : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. नानासाहेब थोरात यांचे शुक्रवारी (ता. १८) सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. डॉ. थोरात हे इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मेरी क्युरी फेलो असून, कोविडवरील लस संशोधनाची महत्त्वपूर्ण कामगिरी करणाऱ्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या चमूचे सदस्य आहेत. विद्यापीठाच्या 'मीट द सायंटिस्ट' या उपक्रमांतर्गत त्यांचे 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील संधी, उपयोजन व जागतिक संधी' या विषयावर व्याख्यान होणार आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षस्थानी, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित असतील. व्याख्यानास उपस्थित राहावे, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कक्षाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी केले.

17 AUG 2023

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सत्यवृत्त

# जागतिक विद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेसाठी जतची राणी धावणार



सांगली - जत तालुक्याच्या वैभवशाली क्रीडा परंपरेत आणखी एक सुवर्णपान जोडले गेले आहे. येथील राणी सदाशिव मुचंडी ही चीनमधील चेंगडूच्या ट्रॅकवर धावणार आहे. जागतिक विद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक एच. एम. मुजावर यांनी ही माहिती दिली.

जत तालुक्यात अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू निर्माण झाले आहेत. कन्या हायस्कूल व श्री दत्त माध्यमिक विद्यालयाने क्रीडा क्षेत्रात दबदबा कायम ठेवला आहे. सुवर्णकन्या स्वाती व्हनवाडे यांच्यानंतर राणी मुचंडी हिने जतच्या वैभवात भर घातली आहे.

राष्ट्रीय खेळाडू राणी हिची जागतिक आंतरविद्यापीठ क्रीडा स्पर्धेसाठी चीनमधील चेंगडू येथे गेली आहे. तेथील स्पर्धांना सुरुवात झाली आहे. नुकतेच भुवनेश्वर (ओडिसा) येथे झालेल्या अखिल भारतीय युनिव्हर्सिटी स्पर्धेत, हाफ मॅरेथॉन (२१ किलोमीटर) स्पर्धेत १ तास २१ मिनिटे वेळ तिने नोंदवली.

राणी ही कन्या हायस्कूल व श्री दत्त उच्च माध्यमिक विद्यालयात २०१८ पर्यंत राष्ट्रीय क्रीडा प्रशिक्षक हाजीसाहेब मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत होती. तेव्हा तिने मध्य प्रदेशातील राष्ट्रीय असोसिएशन क्रॉस कंट्री स्पर्धेत सहभाग नोंदवला. २ जानेवारी २०१८ मध्ये बालेवाडी येथील राष्ट्रीय शालेय क्रॉस कंट्री स्पर्धेत पाचवा क्रमांक मिळवला होता.

२०१८ नंतर भारतीय खेल प्राधिकरणचे प्रशिक्षक सिंग यांच्याकडे ती सराव करीत होती. २०१४ पासून तिने अनेक राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्पर्धातून पदके मिळवली आहेत. सध्या ती शिवाजी विद्यापीठ अंतर्गत कोरेगाव येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात एम. ए. प्रथम वर्षात शिकते. जागतिक विद्यापीठ मॅरेथॉन स्पर्धेसाठी निवड झाल्याबद्दल मुख्याध्यापक अण्णासाहेब लोखंडे, क्रीडा प्रशिक्षक एच. एम. मुजावर यांनी तिचे अभिनंदन केले.

तरुण भारत

# डॉ. नानासाहेब थोरात यांचे शुक्रवारी व्याख्यान

कोल्हापूर : आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक व शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी डॉ. नानासाहेब थोरात यांचे शुक्रवार १८ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शिवाजी विद्यापीठात व्याख्यान आयोजित केले आहे. डॉ. नानासाहेब थोरात हे इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठाचे मेरी क्युरी फेलो आहेत. कोविडवरील लस संशोधन करणाऱ्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या पथकातील ते सदस्य आहेत. येत्या शुक्रवारी विद्यापीठाच्या 'मीट द सायंटिस्ट" या उपक्रमांतर्गत त्यांचे 'आंतरविद्याशाखीय संशोधनातील संधी, उपयोजन व जागतिक संधी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित केले आहे. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित असतील. विद्यार्थी, संशोधक, पालक व शिक्षकांनीही उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कक्षाचे समन्वयक डॉ. एस. बी. सादळे यांनी केले आहे.

तरूण भारत

# दीक्षांत पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज भरण्यास आजपासून प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ६० वा दीक्षांत समारंभ डिसेंबर २०२३ दरम्यान होण्याची शक्यता आहे. दीक्षांत समारंभात पदवी प्रमाणपत्रांच्या मागणीसाठी अर्ज भरण्यास नियमित शुल्क २५० आज (दि. १७) पासून प्रारंभ होणार आहे. तर ५ सप्टेंबर अर्ज भण्याची अखेरची तारीख आहे. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. शिवाजी विद्यापीठ अंतर्गत दीक्षांत समारंभासाठी ६ ते १५ सप्टेंबरपर्यंत ३५० रूपये शुल्क भरून अर्ज करता येणार आहे. १६ ते २५ सप्टेंबरपर्यंत ८५० रूपये शुल्क भरून अर्ज करता येणार आहे. पीएच. डी. प्राप्त विद्यार्थ्यांचे दीक्षांत अर्ज ३० सप्टेंबरपर्यंत ८५० शुल्काने अर्ज स्विकारले जाणार आहे. सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन भरलेल्या अर्जाची प्रत स्वत:च्या माहितीसाठी जपून ठेवावी. विधी विद्याशाखा विद्यार्थ्यांनी फक्त अंतिम वर्षाच्या पदवी प्रमाणपत्राकरीता ऑनलाईन अर्ज करावा. तीन वर्षातील बॅचलर ऑफ लॉ (जनरल) व पाच वर्षातील बॅचलर ऑफ सोशल पदवी प्रमाणपत्राकरीता मॅन्युअल अर्ज भरावा. २००२ पुर्वीचा ऑनलाईन अर्ज भरता येत नसेल, तर पूरक कागदपत्रांसह दीक्षांत विभागाशी संपर्क साधावा. अर्ज भरताना तक्रार असल्यास विद्यार्थ्यांनी लॉगईन मधील ग्रीव्हन्समध्ये नोंदवावी. गुणपत्रकात दुरूस्ती असल्यास परीक्षा विभागाशी संपर्क साधावा. दुरूस्तीनंतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाईन अर्ज भरावा. दीक्षांत समारंभाची तारीख यथावकाश कळवण्यात येणार आहे.